# <u>प्रेस नोट</u>

**परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील वारजे माळवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर, तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्ह्यातून हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- २६/०३/२०१९

वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे शुभम बाळासाहेब हनमघर वय-२० रा. वनबाई बराटे शाळे जवळ, रामनगर, वारजे माळवाडी, पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०९/२०१९ दिनांक २६/०३/२०१९ रोजी (२) दोन वर्षा करीता पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय तसेच पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह स्वतः जवळ अग्नी शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे, मारामारी करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द वारजे माळवाडी,उत्तम नगर तसेच पौड पुणे ग्रामीण या पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे तसेच पुणे जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातून दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**( मंगेश शिंदे )**
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ ३, पुणे शहर

## प्रेस नोट

**परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील उत्तमनगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे जिल्ह्यातून हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- २८/०३/२०१९

वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे महेश पांडूरंग भगत वय-२५ रा. वनबाई बराटे शाळे जवळ, रामनगर, रामनगर, वारजे माळवाडी, पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक १०/२०१९ दिनांक २८/०३/२०१९ रोजी (१) एक वर्षा करीता पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय तसेच पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह स्वतः जवळ अग्नी शस्त्र बाळगणे, दरोडा,छेडछाड करणे, मारामारी करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द वारजे माळवाडी पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे तसेच पुणे जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातून दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**( मंगेश शिंदे )**
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ ३, पुणे शहर